सा.बीड
लक्ष्यवेध
अचुक लक्ष्य भेदणारे

संपादक : निलेश पुराणिक EDITOR- NILESH PURANIK Email Id- beedlakshyavedh@gmail.com

वर्ष-३ ले अंक ५० मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २०२६ पाने ४+४ पोस्टल नंबर- L SB/Beed/RNP-255/2025-2027 आरएनआय नं.- MAHMAR/2023/89380 मुल्य २ रुपये

Year-3 Paper- 50 Tuesday 17 November 2026 Page-4+4 Postal No. :- L SB/Beed/RNP-255/2025-2027 RNI :- MAHMAR/2023/89380 Price- 2 Rs.



प्रकाशदादा जयसिंह भैय्यांना बळ द्या, महायुतीचे नुकसान करु नका

भावी नेतृत्वाला राजकीय अडथळे नव्हे, विजयाची शिदोरी द्या!



पुराणिक निलेश । बीड

माजलगावच्या राजकारणात पाच वेळा विजय मिळवून स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करणारे प्रकाशदादा सोळंके सध्या मात्र आपल्या राजकीय भूमिकांमुळे चर्चेत आहेत. कधी राजकारणातून निवृत्तीची घोषणा, कधी जयसिंह भैय्या नेतृत्व करतील असे संकेत, तर कधी धनंजय मुंडे माझे नेते नाहीत, अशी भूमिका. काही दिवसांपूर्वी बीडमध्ये मंत्रिपदाबाबत केलेले ओबीसी नेत्यांसंदर्भातील विधानही चर्चेत आले. या सगळ्या राजकीय घडामोडी पाहता प्रकाशदादांनी आता राजकीय वाद-विवाद आणि नेतृत्वाच्या संघर्षापेक्षा माजलगावच्या विकासाला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. खरोखरच राजकारणातून निवृत्तीचा विचार असेल, तर जाता-जाता जयसिंह सोळंके यांना बळ द्या; मात्र या प्रक्रियेत महायुतीचे आणि जयसिंह भैय्यांचे राजकीय नुकसान होईल, अशी कोणतीही भूमिका घेऊ नका, असा सूर नागरिकांतून उमटत आहे.

माजलगाव मतदारसंघाचा राजकीय इतिहास पाहिला तर सोळंके घराण्याचे योगदान नाकारता येणार नाही. प्रकाशदादांच्या वडिलांनी या मतदारसंघातून राज्याच्या राजकारणात आपली छाप निर्माण केली. त्यानंतर प्रकाश सोळंके यांनी तब्बल पाच वेळा आमदार म्हणून विजय मिळवत मतदारांचा विश्वास संपादन केला. जनतेने त्यांना वेळोवेळी भरभरून मते दिली, सत्ता दिली, नेतृत्वाची संधी दिली. त्यामुळे आजही प्रकाशदादांकडून माजलगावकरांच्या अपेक्षा आहेत. मात्र, या अपेक्षांना विकासाच्या कामातून उत्तर मिळण्याऐवजी राजकीय विधानांमधूनच चर्चा रंगत असेल, तर त्याचा विचार दादांनी करायला हवा.

यापूर्वीही प्रकाशदादांनी राजकारणातून निवृत्ती घेत असल्याचे सांगत जयसिंह भैय्या नेतृत्व करतील, असे संकेत दिले होते. मात्र, त्यानंतर पुन्हा राजकारणात सक्रिय भूमिका घेतल्याने त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला. आता धनंजय मुंडे माझे नेते नाहीत, असे विधान केल्याने पुन्हा एकदा राष्ट्रवादीतील अंतर्गत राजकारणाची चर्चा सुरू झाली आहे. काही दिवसांपूर्वी मंत्रिपद ओबीसी नेत्यांनाच मिळते, अशा आशयाच्या विधानातूनही राजकीय वर्तुळात वेगवेगळे अर्थ काढले गेले. प्रकाशदादांसारख्या अनुभवी नेत्याने कोणाला नेता मानावे, कोणाशी राजकीय मतभेद ठेवावेत, हा त्यांचा वैयक्तिक निर्णय असू शकतो; मात्र अशा विधानांचा परिणाम पक्षाच्या एकजुटीवर आणि महायुतीच्या राजकीय समीकरणांवर होऊ

◀◀ पान २ वर

गुरुमाऊली हॉस्पीटलमधील 'त्या' मेडिकलची विक्री बंद!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील गुरुमाऊली हॉस्पिटलमधील खुशी हेल्थकेअर मेडिकलमधून एका गंभीर रुग्णाला मुदत संपलेली औषधे दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अखेर कारवाईचा बडगा उगारला आहे. सहाय्यक आयुक्त महादेव निमसे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संबंधित मेडिकलची तपासणी करून शुक्रवारी (दि. १३) सायंकाळी औषध विक्री बंद करण्याचे आदेश दिले. मात्र, एका मेडिकलवर कारवाई करून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. शहरात अशी किती मेडिकल आहेत, जिथे औषधांच्या एक्सपायरी डेटकडे दुर्लक्ष केले जाते? याची व्यापक तपासणी होणे गरजेचे आहे.

गुरुमाऊली हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या एका मधुमेहग्रस्त वृद्ध महिलेला तेथील मेडीकलचालकाने चक्क वर्षभरापूर्वी मुदत संपलेल्या गोळ्या देण्यात आल्याचा आरोप आहे. या औषधांचे सेवन केल्यानंतर महिलेचा त्रास वाढल्याचे नातेवाइकांचे म्हणणे आहे. संशय आल्याने त्यांनी औषधांच्या



पाकिटावरील तारीख तपासली असता, औषधे गेल्या वर्षीच मुदतबाह्य झाल्याचे निदर्शनास आले. रुग्ण उपचारासाठी

डॉक्टरांची जबाबदारी केवळ प्रिस्क्रिप्शन देण्यापुरतीच?

या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे रुग्णालयातील डॉक्टरांची जबाबदारी. रुग्णाला औषधे लिहून दिल्यानंतर तो अनेकदा त्याच रुग्णालयातील मेडिकलमधून औषधे खरेदी करतो. डॉक्टरांना हे औषध किती वेळा सकाळी, दुपारी, रात्री कोणते घेवू हे विचारतो त्यामुळे या प्रकाराकडे संबंधित डॉक्टरांनीही याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

रुग्णालयात दाखल होतो तो जीव वाचवण्यासाठी; मात्र त्याच रुग्णाला मुदतबाह्य औषधे मिळत असतील तर हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून रुग्णांच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.

◀◀ पान २ वर

धरणांत ११ टक्केच पाणी; बीडकरांचा पुढचा उन्हाळा कसा जाणार?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात यंदा पावसाने दिलेली ओढ आता पाणीटंचाईच्या रूपाने समोर येत आहे. जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा झपाट्याने घटत असून १२ नोव्हेंबरच्या अहवालानुसार एकूण साठा अवघा ११.११ टक्क्यांवर आला आहे. माजलगाव धरणात १९.७१ टक्के पाणी शिल्लक असताना बीड शहरासाठी महत्त्वाच्या असलेल्या बिंदुसरा धरणातील साठा केवळ २.८१ टक्के राहिला आहे. सिंदफणा धरणातील साठा तर ०.३८ टक्क्यांवर पोहोचल्याचे वृत्त आहे. जिल्ह्यातील १४६ लघु प्रकल्पांमध्येही पाण्याची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. दुसरीकडे, २ नोव्हेंबरच्या स्थितीनुसार जिल्ह्यातील ७७२ गावे आणि १८३ वाड्यांमधील सुमारे ४ लाख २२ हजार नागरिकांना २२४ टँकर आणि अधिग्रहित विहिरी-बोअरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात होता. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पाणीपुरवठ्याचे नियोजन कसे होणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. बीड शहरासह गेवराई, आष्टी, माजलगाव, पाटोदा, धारूर, वडवणी आणि परळी परिसरात पाण्याचे उपलब्ध स्रोत किती दिवस पुरणार, याचे तालुकानिहाय चित्र प्रशासनाने जाहीर करणे आवश्यक आहे.

नेपाळमधील कर्करोगग्रस्त रुग्णावर माजलगावात यशस्वी शस्त्रक्रिया

शासकीय योजनेच्या मर्यादा ओलांडून डॉ. यशवंत राजेभोसलेंनी जपला माणुसकीचा धर्म

माजलगाव । प्रतिनिधी

कर्करोगासारख्या गंभीर आजारावरील उपचारांसाठी मुंबई, पुणे, हैद्राबादसारख्या महानगरांकडे धाव घेण्याचे दिवस आता बदलण्याची आशादायी सुरुवात माजलगावातून झाली आहे. नेपाळमधील एका कर्करोगग्रस्त रुग्णाने उपचारासाठी थेट माजलगाव गाठले. मालीपारगाव येथील गुरुकृपा हॉलिस्टिक कॅन्सर वेलनेस आरोग्यधाम अंतर्गत यशवंत रुग्णालयातील डॉक्टरांनी कर्करोगाच्या ट्युमरची यशस्वी शस्त्रक्रिया केली. शासकीय योजनांच्या लाभाच्या मर्यादा असतानाही एका परदेशी रुग्णाच्या वेदना समजून घेत डॉ. राजेभोसले यांच्या टीमने माणुसकीचा धर्म जपला. थेट परदेशातील रुग्णाने उपचारासाठी माजलगावसारख्या ग्रामीण भागाची निवड करण्याची ही पहिलीच घटना ठरली आहे.



रुग्ण कोणत्या देशाचा, जातीचा, धर्माचा आहे किंवा त्याची परस्थितीत काय आहे यापेक्षा त्याच्या वेदना आणि त्याला आवश्यक असलेली आरोग्यसेवा आमच्यासाठी अधिक महत्वाची आहे. सर्वसामान्य रुग्णाची मोठ्या शहरातील धावपळ, आर्थिक ओढाताण कमी होऊन दर्जेदार आरोग्यसेवा देणे हाच गुरुकृपा आरोग्यधामचा उद्देश आहे. रुग्णाला सन्मान, संवेदनशीलता आणि योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

डॉ. यशवंत राजेभोसले, संस्थापक, गुरुकृपा होलिस्टिक कॅन्सर वेलनेस आरोग्यधाम, माजलगाव.

नेपाळमध्ये कर्करोगावर उच्चदर्जाचे उपचार उपलब्ध नसल्याने रुग्णाने भारतात उपचार घेण्याचे ठरविले; परंतु नवी दिल्ली येथील रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी ५ ते ७ लाख रुपयाचा खर्च लागणार असल्याचे रुग्णाला सांगण्यात आले. त्यानंतर रुग्णाला माजलगाव येथील 'गुरुकृपा आरोग्यधाम'ची माहिती मिळाली. गुरुकृपाचे संस्थापक डॉ. यशवंत राजेभोसले यांनी शासकीय योजनेचा विचार न करता रुग्णावर अत्यल्प खर्चात उपचार करण्याचे ठरवले. रुग्ण नेपाळमधून भारतात आल्यानंतर छत्रपती संभाजीनगर विमानतळावर रुग्णाचे आगमन झाले. गुरुकृपा आरोग्यधामचा आरोग्य रथ आणि डिजिटल आरोग्य वाहिनीच्या माध्यमातून त्याला थेट माजलगाव येथे आणण्यात आले; परंतु भारत सरकारच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ परदेशी नागरिकाला मिळणे शक्य नसल्याने या रुग्णाला उपचार देण्यास अनेक मर्यादा होत्या. अशा परिस्थितीत जागतिक आरोग्यसेवेचा सेवाभाव डोळ्यांसमोर ठेवून डॉ. यशवंत राजेभोसले यांनी पुढाकार घेतला आणि तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. प्रसिद्ध सर्जन डॉ. युवराज कोल्हे, डॉ. महेश काळे, भूलतज्ञ डॉ. शिवाजीराव काकडे, हृदयरोगतज्ञ डॉ. यशवंत राजेभोसले यांनी संबंधित रुग्णाच्या मोठ्या आतड्याला झालेल्या कर्करोगाची तब्बल दोन तास शस्त्रक्रिया करून यशस्वी केली.या घटनेमुळे माजलगावच्या आरोग्यसेवेची ओळख आता देशाच्या सीमा ओलांडून परदेशापर्यंत पोहोचली आहे. ग्रामीण भागातही दर्जेदार उपचारांची सुविधा उभी राहू शकते, याचा विश्वास या घटनेने निर्माण केला आहे. गुरुकृपा कॅन्सर आरोग्यधाम भविष्यात ग्रामीण भागातील सर्वसामान्य कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी संजीवनी ठरण्याच्या दिशेने हि पहिले पाउल आहे. गंभीर आजारावरील उपचारांसाठी महानगरांमध्ये जाऊन

◀◀ पान २ वर